**ठळक बातम्या**

- राज्यभरात गणेशोत्सवाची जय्यत तयारी, सार्वजनिक मंडळांसह घरोघरी गणपतीच्या आगमनाचा उत्साह

- VJNT संवर्गातल्या नागरिकांना शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी विशेष मोहिम राबवण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना पूर्वपरवानगीशिवाय आझाद मैदानावर आंदोलन करायला मुंबई उच्च न्यायालयाचा नकार, मर्यादित आंदोलकांसह परवानगी द्यायची सरकारची तयारी

**आणि**

- अमेरिकेकडून लागू होणाऱ्या अतिरिक्त आयात शुल्काची आकारणी उद्यापासून सुरू होणार असल्यानं शेअर बाजारात जोरदार घसरण

**<><><><>**

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला उद्यापासून सुरुवात होणार असून गणरायाच्या स्वागतासाठी सर्वत्र जय्यत तयारी होत आहे. महाराष्ट्रात यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे आणि त्याच्या तयारीला वेग आला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून नवीन ध्येयांसह सकारात्मकतेनं पुढे जाण्याची प्रेरणा मिळत असल्याचं राष्ट्रपतींनी संदेशात नमूद केलं आहे. गणेशोत्सव साजरा करताना मंडळांनी सामाजिक सौहार्द आणि एकोपा वाढवण्यासाठी प्रयत्न करावं, असं आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे.

राज्यभरातल्या गणेशोत्सवाच्या तयारीविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

\- **- -होल्ड अंकिता व्हाइस कास्ट - -**

*(१४ विद्या आणि ६४कलांचा अधिपती असलेल्या गणरायाचं आगमन अवघ्या काही तासांवर आलं आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वचजण लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहेत. गणरायाच्या आगमनाच्या आदल्या दिवशी आज घरोघरी हरतालिकांचं मनोभावे पूजन करण्यात आलं.*

*मुंबईत दरवर्षी दहा हजारापेक्षा जास्त सार्वजनिक आणि दोन लाखांपेक्षा जास्त घरगुती गणपतींची स्थापना केली जाते. यंदाही लालबागचा राजा, सिद्धिविनायक अशा सार्वजनिक गणपतींसह घरगुती गणपतींच्या स्वागतासाठी मुंबापुरी सज्ज झाली आहे. गणपतीचं मखर, आरास, सजावटीचं सामान, फुलं इत्यादी खरेदी करण्यासाठी बाजारपेठांमध्ये लगबग आहे. मुंबईतले कोकणवासिय याआधीच गावी गेले आहेत. मुंबई, पालघर, ठाण्यातून जवळपास २९०० एसटी बस रत्नागिरीत आल्या आहेत.* ***रत्नागिरी*** *जिल्ह्यात यंदा एक लाख ६९ हजारांहून अधिक खासगी आणि सुमारे सव्वाशे सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७२ हजार ७५५ घरगुती गणपती आणि ३२ सार्वजनिक गणपती विराजमान होणार आहेत. गणेश मूर्ती शाळातून आधीच दोन दिवस मूर्ती घेऊन जायला सुरुवात झाली आहे. गणेशोत्सवासाठी येणाऱ्या कोकणवासीयांची आरोग्य तपासणी करण्यासाठी रेल्वे आणि बस स्थानकावर वैद्यकीय पथक तैनात करण्यात आली आहेत. पुण्याचा वैभवशाली सार्वजनिक गणेशोत्सव अनुभवण्यासाठी राज्यभरातून तसंच अन्य राज्यातून आणि परदेशातूनही अनेकजण पुण्यात दाखल झाले आहेत. गणेशोत्सवाच्या कालावधीत पुणे महानगर परिवहन महामंडळाने बसच्या अतिरिक्त फेऱ्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या इतर भागातही गणेशोत्सवाची तयारी जोरात असल्याचं दिसून येतंय.)*

**<><><><>**

मुंबईहून कोकणाकडे जाण्यासाठी रो रो सेवा सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याची माहिती बंदरे आणि मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी आज मंत्रालयात दिली. एम टू एम ही बोट मुंबई ते रत्नागिरी आणि मुंबईत ते सिंधुदुर्ग चालवण्याची परवानगी देण्यात आली आहे. वातावरण अनुकूल झाल्यानंतर बोट सेवा सुरू होईल, असं त्यांनी सांगितलं. यामुळं जयगडपर्यंत साडेतीन तासात आणि विजयदुर्गपर्यंत साडेपाच तासात पोहोचता येईल. यासाठी अडीच ते ९ हजार रुपये तिकीट असेल.

**<><><><>**

विमुक्त जाती आणि भटक्या जमाती संवर्गातल्या लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे तसंच विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची कार्यपद्धती प्रभावीरित्या राबवण्याचा निर्णय आज राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत झाला. मंत्रालयात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस होते. या निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- **- -होल्ड तुषार व्हाइस कास्ट - - -**

*(VJNT संवर्गातल्या नागरिकांना ओळखपत्रं तसंच प्रमाणपत्रं देण्यासाठी विविध ठिकाणी शिबिरांचं आयोजन केलं जाईल. केवळ घोषणापत्रावर आधारीत जातीचे दाखले दिले किंवा ग्रामसेवकांचे प्रमाणपत्र ग्राह्य मानून जातीचे दाखले दिले तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता असते. त्यामुळे यापुढे तहसिलदार आणि प्रांताधिकारी यांची खात्री झाल्यावरच तसेच जातीची स्थानिक पातळीवर चौकशी करुन खात्री झाल्यावर जातीचे दाखले दिले जाणार आहेत.*

*राज्यातल्या कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करून महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यात आले आहे. त्यातल्या महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा तसंच आरोग्य आणि कार्यस्थळ संहिता नियम, २०२५ चे प्रारूप केंद्र सरकारच्या सहमतीसाठी पाठवायला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.*

*नागपूर - गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्गालाही राज्य सरकारनं आज मान्यता दिली. यामुळं तीन तासांचे अंतर सव्वा तासावर येणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमांमध्ये सुधारणा, बीड जिल्ह्यातल्या आष्टीमध्ये न्यायालय स्थापन करण्यासाठी खर्चाला मान्यता सरकारनं दिली. बीड जिल्ह्यातल्या ३ बंधाऱ्यांचा विस्तार यासारखे निर्णयही आजच्या बैठकीत झाले. यामुळे खरीप-रब्बी हंगामात शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढणार आहे.)*

**<><><><>**

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा त्यांच्या एकत्रित साहित्यातून नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांनी म्हटलं आहे. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या एकत्रित महावाङ्मयाचं प्रकाशन आज मुंबईत केल्यानंतर ते बोलत होते.

महाज्योती संस्थेमार्फत हे समग्र वाङ्मय प्रकाशित करण्यात आलं आहे. या साहित्यसंग्रहात महात्मा फुले यांचे २३ तर सावित्रीबाई फुले यांचे १४ ग्रंथ, त्यांचा पत्रव्यवहार तसेच महत्त्वपूर्ण दस्तऐवजांचा समावेश आहे. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नव्या संकेतस्थळाच उद्घाटनही मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना पूर्वपरवानगी न घेता मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करता येणार नाही, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आज दिला. याविषयी सविस्तर जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड कौस्तुभ व्हाइस कास्ट - -**

*(मुंबईचं दैनंदिन जीवन आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या कायदा-सुव्यवस्थेचा विचार करता त्यांना खारघर इथं पर्यायी जागा देण्याचा विचार सरकारने करावा, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठानं सुचवलं. मतभेद हा लोकशाहीचा अविभाज्य भाग असला, तरी आंदोलनं ठरवून दिलेल्या ठिकाणीच व्हावी, असंही न्यायालयानं नमूद केलं.*

*न्यायालयानं परवानगी नाकारल्यानंतरही जरांगे-पाटील आंदोलन करण्यावर ठाम आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला आव्हान देऊ, न्यायदेवता आम्हाला न्याय देईल, असंही त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.*

*जरांगे यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या पोलीस महासंचालक आणि मुंबई पोलीस आयुक्तांची महत्त्वपूर्ण बैठक आज झाली. जरांगे यांनी परवानगी मागितली, तर त्यांना आझाद मैदानावर आंदोलन करायची सशर्त परवानगी दिली जाईल, मात्र तिथं लाखोचा जमाव एकत्र येणार असेल, तर खारघर किंवा त्या भागातल्या ठिकाणीच आंदोलनाची परवानगी दिली जाईल, असा निर्णय या बैठकीत झाला.*

*नव्या मराठा आरक्षणासंदर्भातल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठकही आज मंत्रालयात झाली. जरांगे यांच्या मागणीप्रमाणे न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीला सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय उपसमितीनं घेतल्याची माहिती समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे*

*पाटील यांनी बैठकीनंतर वार्ताहरांशी बोलताना दिली. जरांगे यांच्या इतर मागण्यांबद्दलही सरकार सकारात्मक असून जरांगे यांनी तात्पुरतं आंदोलन स्थगित करावं, अशी विनंती त्यांनी केली. )*

<><><>

अमेरिकेकडून लागू होणारं अतिरिक्त आयात शुल्काची अंमलबजावणी उद्यापासून सुरू होणार असल्यानं देशातले शेअर बाजार आज मोठ्या प्रमाणात घसरले. सकाळपासून घसरणीत सुरू झालेले शेअर बाजार अखेरच्या अर्धा तासात आणखी जास्त घसरले. व्यवहार संपले तेव्हा सेन्सेक्स ८४९ अंकांनी घसरुन ८० हजार ७८७ अंकांवर स्थिरावला. निफ्टी २५६ अंकांची घट नोंदवून २४ हजार ७१२ अंकांवर बंद झाला.

<><><>

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत  राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्रालयाने ५६ अधिसूचित सेवा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करुन दिल्या आहेत अशी माहिती उच्च आणि तंत्रज्ञान मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीदरम्यान ते बोलत होते. या सेवांपैकी वीस सेवा विद्यापीठांशी संबधित आहेत त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोचवाव्यात अस त्यांनी सांगितलं.

<><><>

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १५ जून रोजी सेट परीक्षा घेतली होती. मात्र अजून निकाल जाहीर न केल्यामुळे, आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने विद्यापीठाच्या सेट परीक्षा भवनसमोर धरणे आंदोलन केले. या आंदोलनानंतर विद्यापीठाने ३० ऑगस्ट रोजी निकाल जाहीर करण्याचे लेखी आश्वासन दिले असल्याची माहिती विद्यार्थी परिषदेनं दिली.

<><><>

लंडनमधल्या महाराष्ट्र मंडळ या संस्थेला लंडनमधली  ‘चर्च ऑफ इंग्लंड’ची इमारत खरेदी करुन तिथं ‘महाराष्ट्र भवन’ उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

<><><>

बारामतीतल्या महिला शेतकऱ्यांनी चाळीस मेट्रिक टन हिरव्या मिरच्याची निर्यात दुबईला केली. आर्थिक विकास महामंडळाने नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम

विकास प्रकल्पांतर्गत त्यांना मार्गदर्शन केलं. यासाठी नेदरलँडमधल्या तंत्रज्ञानाचा वापर झाला.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात विदर्भ आणि कोकणात बऱ्याच ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल. किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असून राज्यात सर्वत्र तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याचं पुणे वेधशाळेच्या हवामान वृत्तात म्हटलं आहे.

**//<><><><>//**